# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, १३२.बी, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

दुरध्वनी क्रमांक / फॅक्स : 020-25510419/519 ई-मेल : mauebpune@yahoo.co.in


## बातमी प्रसिध्दीसाठी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्या शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी आचार्य पदवी (Ph.D) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा -२०२० महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदव्युत्तर विद्यार्थी जे सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम पदव्युत्तर परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याची तारीख **दि.२२.०६.२०२० ते दि. १३.०७.२०२०** अशी राहील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर SBI i collect link व्दारे online स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थानिक शाखेत परीक्षा शुल्क **दि. २२.०६.२०२० ते दि.१७.०७.२०२०** तारखेपर्यंत स्वीकारली जाईल. ही परीक्षा दि.२९ ऑगस्ट, २०२० रोजी महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांच्या मुख्यालयी केंद्रांवर आयोजित करण्यात येईल. संबंधित परिक्षा केंद्रांवर, कोरोना/कोव्हीड - १९ विषाणू / रोगाचा प्रादुर्भाव आणि प्रसार टाळण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने शैक्षणिक संस्थानसाठी वेळोवेळी निर्गमित/ प्रसारित केलेल्या आवश्यक त्या **"मानक कार्यप्रणालींचे (एसओपी )"** काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या http://www.mcaer.org या संकेतस्थळावर पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः भरावयाचे आहेत. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक वाचणे अत्यावश्यक आहे. संबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. संभाव्य पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दि.२७.०७.२०२० रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेश पत्र वरील संकेतस्थळावरुन **दि.१९.०८.२०२०** पासून स्वतः प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

उत्तराची नमुना पत्रिका **दि. ०८.०९.२०२०** व परीक्षेचा निकाल **दि.१०.०९.२०२०** रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८५१९/ ०२०-२५५२८११९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे डॉ. ए.पी. सुर्यवंशी, नियंत्रक महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

दिनांक : १७/०६ /२०२०
स्थळ : पुणे

नियंत्रक
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

Scanned with CamScanner